दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.


RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २७९ वा | शुक्रवार दि. ४ ऑगस्ट २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## प्रसिद्ध कवी ना.धों. महानोर यांचं निधन

**मुंबई ।** प्रसिद्ध कवी, गीतकार ना.धों. महानोर यांचं निधन झालं आहे. वयाच्या ८१ व्या वर्षी कवी ना. धों महानोर यांनी अखेरचा



श्वास घेतला. पुण्यातील रुबी हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर मागच्या काही दिवसांपासून उपचार सुरु होते. उपचारांदरम्यान आज त्यांची प्राणज्योत मालवली आहे. ना. धों. महानोर यांच्या निधनाने साहित्य विश्वावर शोककळा पसरली आहे. ग्रामीण जीवन शब्दबद्ध करणारा, गावगाड्यातील गोष्टी सोप्या शब्दात मांडणारा संवेदशील माणूस हरपल्याची भावना साहित्य विश्वातून व्यक्त होत आहे.

# लांडोर बंगला परिसरात स्नेहमिलनासह वनभोजनाचा निसर्गानंद

### आनंद लोंढे, शंकर खरात, किरण गायकवाड यांचे आयोजन

**धुळे । प्रतिनिधी**





मुंबई-आग्रा महामार्गावर धुळे शहरापासून जवळच असलेल्या किल्ले लळींग कुरणातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य लाभलेल्या लांडोर बंगला येथील निसर्गरम्य परिसरात स्नेहमिलन व वनभोजनाचा कार्यक्रम बुधवारी पार पडला.

आझाद समाज पार्टीचे प्रदेश कार्याध्यक्ष आनंद साहेबराव लोंढे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक शंकर खरात, समता समाज संघाचे जिल्हाध्यक्ष किरण गायकवाड यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. आजच्या धावपळीच्या व धकाधकीच्या युगात माणूस माणसांमध्ये राहूनही माणूसपणापासून दूर झाला आहे. एकमेकांना भेटायला, बोलायला वेळ मिळत नाही. नातलगांशी संवाद होतोय पण तो प्रत्यक्ष नाही तर मोबाईलवर होतोय. मित्र मंडळी, सहकारी, आप्तेष्ट हे देखील मोबाईलच्या संपर्कानेच कनेक्ट होतात. फेस टु फेस संपर्क व्हिडिओ कॉलिंगनेच केला जातोय. काय हवे, काय नको, उठलात का, जेवलात का, झोपलात का, गुड मॉर्निंग, गुड नाईट, हॅप्पी बर्थ डे, हॅप्पी ॲनिव्हर्सरी, भावपूर्ण श्रध्दांजली हे सारं काही सोशल मीडिया वापरातूनच चालले आहे. माणूस माणसापासून हरवलाय असं देखील मोबाईलवरुनच वाचायला मिळत आहे. अशा या बिझी शेड्युलिंगच्या दुनियेत आपण आपल्या जवळच्या व्यक्तींना भेटावे, मनमोकळे बोलावे, गप्पा मारत एकमेकांसोबत वेळ घालवावा. तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती, लांडोर बंगला येथील 'भीमस्मृती यात्रा' यासह विविध कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पोलीस प्रशासनाने केलेल्या अनमोल सहकार्याबद्दल त्यांना धन्यवाद देणे या उद्देशाने आनंद लोंढे, शंकर खरात, किरण गायकवाड यांनी लांडोर बंगला परिसरात आयोजित केलेला स्नेहमिलन आणि वनभोजनाचा हा कार्यक्रम बुधवार दि. २ ऑगस्ट रोजी पार पडला.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करताना धुळे पोलीस दलाने खूप चांगले सहकार्य केले. काही अप्रिय घटनांच्या पार्श्वभूमीवर मोर्चे निघाले, आंदोलने झाली. समाजजीवनात अस्वस्थता व अशांततेचे वातावरण निर्माण झाले. या सर्व तणावग्रस्त परिस्थितीत पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, उपअधीक्षक रुषीकेश रेड्डी व वरिष्ठ पोलीस अधिकारींचे नेतृत्व व मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलीस दलाने कोणतेही अनुचित प्रकार घडू न देता परिस्थितीवर बारीक लक्ष देवून नियंत्रण ठेवले. समाजातील प्रत्येक घटकांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण केला. याबद्दल पोलीस दलाचे आभार मानण्यासाठी पोलीस अधिकारीवर्गाला या स्नेहमिलन सोहळ्याला विशेष आमंत्रित करण्यात आले होते. तसेच दलित, पुरोगामी चळवळीत सक्रीय असलेल्या विविध दलित पक्ष, संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मान्यवर तसेच काही पत्रकार मित्रांनाही या सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले होते. या सर्वांनी स्नेहमिलन सोहळ्यात हजेरी लावून एकमेकांच्या भेटीगाठी घेत, गप्पा रंगवित वनभोजनाचा निसर्गानंद घेतला.

याप्रसंगी धुळे शहर वाहतूक शाखेचे पी.आय. भूषण कोते, मोहाडी पोलीस ठाण्याचे एपीआय शशिकांत पाटील, धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पी.आय. प्रमोद पाटील, वाहतूक शाखेचे एपीआय जितेंद्र आखाडे, ज्येष्ठ दलित नेते एम. जी. धिवरे, ॲड. विलास झाल्टे, आरपीआय आठवले गटाचे नेते शशिकांत वाघ, माजी उपमहापौर नागसेन बोरसे, माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाठ, दलित नेते श्रावण खैरनार, प्रभाकर जाधव, बौध्दाचार्य सुरेश लोंढे, महिला नेत्या नयना दामोदर, राष्ट्रवादीच्या सरोज कदम, संगिता खैरनार, मंगला मोरे, अंजुताई चव्हाण, आरोग्य विभागाचे संजय पवार, महेंद्र शिरसाठ, वचितचे जिल्हाध्यक्ष अरविंद निकम, युवानेते मुकेश खरात, चंद्रकांत सत्तेसा, विशाल पगारे, दिनेश निकुंभे, मनीबाबा खैरनार, डॉ. भूषण पाटील, आबा खंडारे, राजूबाबा शिरसाठ, बापूसाहेब बाविस्कर, संजय जवरास, अमोल शिरसाठ, आबासाहेब अमृतसागर, रामकृष्ण नेरकर, गौतम पगारे, विनोद केदार, पुरोगामी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष सुकलाल बैसाणे, अनिल ठाकूर, पत्रकार रवि नगराळे, सचिन बागुल, सुनील बैसाणे, सनी सोनवणे, नागिंद मोरे, रवि कढरे, संजय गवळी, दीपक खैरनार, प्रवीण मोरे, नितीन म्हसदे, पाटील, महेंद्रसिंग राजपूत यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# दोन दिवसाआड तरी धुळेकरांना पाणी देणार का ?

**धुळे । प्रतिनिधी**

भाजपच्या सत्ताकाळात शहरात रस्त्यांसह विविध विकासकामे निष्कृष्ट होत असल्याच्या तक्रारी सातत्याने होत आहेत. बांधकाम असो कि एलबीटी असो कोणतीही निविदा काढली की 'ए.के.सैफी' नामक ठेकेदाराकडून निविदा हमखास भरली जाते. विशेष म्हणजे त्याने आजपर्यंत एकही टेंडर घेतलेले नाही. हे सर्व ठरवून होत असल्याची शंका व्यक्त करत निवीदा मॅनेज करण्यामागे अधिकारी व ठेकेदारांचे काही गौडबंगाल आहे काय? असा प्रश्न नगरसेवक हर्षकुमार रेलन यांनी स्थायी समितीच्या सभेत उपस्थित केला. तर नगरसेवक किरण अहिरराव यांनी सत्ताधार्यांच्या दररोज पाणी देण्याच्या घोषणेचा फुगा फोडला. ते म्हणाले, धुळेकर नागरिकांना एक दिवसाआड पाणी देणे शक्य नाही, पण दोन दिवसाआड तरी मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त विजय सनेर, नगरसचिव मनोज वाघ, उपायुक्त संगिता नांदुरकर, सदस्य सुनिल बैसाणे, हर्षकुमार रेलन, किरण अहिरराव, नरेश चौधरी, फातेमा अन्सारी, नाजियाबानो पठाण, साबीर खान, वसीम बारी आदींसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सभेच्या अजेंड्यावर एकूण ९ विषय मंजुरीसाठी ठेवण्यात आले होते. सभेच्या सुरवातीला प्रतिसरकारचे नेते क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

सुनिल बैसाणे यांनी, शहरातील नागरिकांकडून गढूळ पाण्याबाबत तक्रारी वाढल्याचे सांगतानाच शहरातील सर्वच जलकुंभ स्वच्छ करण्याची मागणी केली. तसेच जलकुंभावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची सूचना केली. या सूचनांची दखल घेतली जाईल, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले. नरेश चौधरी यांनी, आपल्या भागात आठ-आठ, दहा-दहा दिवसांआड पाणी येत असल्याची तक्रार केली. तसेच या भागात ३० ते ४० व्हॉल्व्हची आवश्यकता असताना हा विषय अजेंड्यावर का घेतला गेला नाही, हा विषय तुमच्यासाठी महत्वाचा नाही का, असा जाब त्यांनी प्रशासनाला विचारला. त्यावर सभापतींनी प्रशासनाला लक्ष घालण्याचे आदेश दिले.

### टेंडर प्रक्रियेमागे गौडबंगाल

**यावेळी हर्षकुमार रेलन म्हणाले की, शहरात निष्कृष्ट विकासकामे होत असल्याबाबत सर्वच वर्तमानपत्रातून ओरड होत आहे. ही सर्व विकासकामे ठरवून झाल्याची शंका आहे. टेंडर प्रक्रियेमागे काहीतरी गौडबंगाल आहे, अशी शंका रेलन यांनी उपस्थित केली.**







### मनपाचे सर्व जलकुंभ महिन्या भरात स्वच्छ करणार

**शहरातील पाणी पुरवठा करणारे मनपाचे सर्व जलकुंभ महिन्या भरात स्वच्छ करण्यात येतील जसेच जिर्ण झालेला अशोक नगर जलकुंभाचे स्ट्रक्चरल ऑडीट करणार असून त्यानंतर नवीन जलकुंभ बांधण्याचा प्रस्तावही दिला जाईल. जलकुंभांमध्ये अक्कलपाडा योजनेचे पाणी भरून पाणी प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे, अशी माहिती उपायुक्त विजय सनेर यांनी स्थायी समितीच्या बैठकीत दिली.**

# महात्मा फुलेंविरोधात वादग्रस्त वक्तव्य भोवले

### नाशिकमध्ये संभाजी भिडेंवर गुन्हा दाखल

**नाशिक । प्रतिनिधी**

शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे यांनी केलेल्या महापुरुषांविषयी वादग्रस्त वक्तव्याचे तीव्र पडसाद उमटत असून राज्यातील अनेक ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नाशिकमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आंदोलन केल्यानंतर क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले कला व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने नाशिकरोड पोलीस ठाण्यात संभाजी भिडेंविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संभाजी भिंडे यांच्या वादग्रस्त वक्तव्याची मालिका काही थांबता थांबत नाही. आधी १५ ऑगस्ट हा खरा स्वातंत्र्यदिन नाही, त्यानंतर आता महात्मा गांधी यांचे वडील मुस्लीम होते, असे वादग्रस्त वक्तव्य संभाजी भिडे यांच्याकडून करण्यात आले आहे. यावरुन वाद सुरु असतानाच पुन्हा एकदा संभाजी भिडे यांच्याकडून साईबाबा आणि महात्मा फुले यांच्याविषयी वादग्रस्त वक्तव्य करण्यात आले. यावरून राज्यभरात संतापाची लाट उसळल्याचे दिसून आले. त्यामुळे अनेक भागात आंदोलने करण्यात आली. काही ठिकाणी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली. तर काही पोलीस ठाण्यात गुन्हे देखील दाखल करण्यात आले आहेत. अमरावती येथील एका कार्यक्रमात शिवप्रतिष्ठानचे प्रमुख संभाजी भिडे यांनी महात्मा गांधी, शिर्डीचे साईबाबा तसेच महात्मा ज्योतिराव फुले यांच्या बद्दल अपशब्द काढले होते. दरम्यान या प्रकारानंतर महाराष्ट्रात अनेक ठिकाणी संताप व्यक्त करून संभाजी भिडे यांच्या विरुद्ध आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्रातील काही पोलीस ठाण्यांमध्ये त्यांच्याविरुद्ध तक्रार दाखल करून गुन्हे दाखल झाले आहेत. आता नाशिकरोड पोलीस ठाण्यात संभाजी भिडे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नाशिक शहरातील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व सांस्कृतिक मंडळाचे कार्यकर्ते संतोष गाडेकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, नाशिकरोड पोलीस ठाण्यात संभाजी भिडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा प्रकार अमरावती येथे घडला असल्याने हा गुन्हा अमरावती पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे.

# तेलंगणा सरकारने घेतलेल्या शेतकरीहिताच्या निर्णयाचे स्वागत

### भारत राष्ट्र समितीची पत्रपरिषद

**धुळे । प्रतिनिधी**



तेलंगणा राज्यातील केसीआर सरकारने शेतकर्यांना १९ हजार रुपयांची कर्जमाफी दिल्याच्या निर्णयाचे स्वागत करुन भविष्यात महाराष्ट्रात आमचे सरकार आल्यास शेतकर्यांना संपूर्ण कर्जमाफी देवू अशी भूमिका भारत राष्ट्र समितीचे जिल्हा समन्वयक ईश्वर पाटील यांनी पत्रकार भवनात झालेल्या पत्रपरिषदेत दिली. याप्रसंगी समितीचे अशोक कद्रे, नाना पाटील, संदीप पवार, सुनिता गोपाळ, पत्रकार संघाचे सचिव सचिन बागुल उपस्थित होते.

ईश्वर पाटील आपल्या पक्षीय मागण्या स्पष्ट करताना म्हणाले की, रासायनिक खते व वि-बीयाणे मोठया प्रमाणात बोगस विक्री सुरु आहेत. शासकीय यंत्रणा सुप्त अवस्थेत कामे सुरु आहेत. शासकीय अधिकारी यांनी वैयक्तिक खते व बियाण्यांसाठी मोठया प्रमाणात कंपनीकडून आर्थिक लाभ मिळवला आहे. याची ईडी व सी.बी.आय चौकशी करण्यात यावी. बी-बियाणे व रासायनिक खते व औषधी या तिन्ही कायद्यात कंपनीकडुन नुकसान भरपाई तरतूदच नाही. याकरिता राज्य शासनाने नविन कायदा बनवुन शेतकऱ्यांना झालेली नुकसानीच्या भरपाई मिळावी कंपनी व शिक्षा म्हणून जन्मठेपेची शिक्षेची तरतुद करावी. अतिवृष्टी व गारपीटीमुळे व नैसर्गिक आपत्ती यांचा वैयक्तिक पंचनामा करून शेतकऱ्यांना पीक विमाच्या लाभ देण्यात यावा.

महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्हयात नैसर्गिकरित्या आलेल्या संकटावर ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले असते. त्यांना शासनाकडून मदत मिळावी. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे गुरेढोरे चोरीला जात आहेत. शेतीपंप केबल व इतर साहीत्य चोरीला जात असूनही महाराष्ट्र राज्य पोलीस यंत्रणा कायदा व सुव्यवस्था राबविण्यास असमर्थ आहे. गुन्हा दाखल होवूनही शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही हे वास्तव स्वीकारुन शासनाने याची चौकशी करावी. महसुल विभागांतर्गत शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी तलाठी, सर्कल, तहसिलदार या मंडळींचे रोज नवनविन कारनामे ऐकून महसूल यंत्रणा भ्रष्टाचाराने भरकटलेली आहे. शासनाने याची दखल घ्यावी. शासनाने पांणद रस्ते व ग्रामीण भागातील शेतीला जोडणारे रस्ते शेतकयांसाठी प्राधान्य देवून मार्गी लावावे अशा मागण्या ईश्वर पाटील यांनी स्पष्ट केल्या.

# धुळ्यात आदिवासी क्रांती सेनेचा महाआक्रोश मोर्चा

**धुळे । प्रतिनिधी**



मणिपूरात आदिवासी महिलांची विवस्त्र धिंड काढून त्यांच्यावर सामुहिक अत्याचार करण्यात आलेत. तसेच एरंडोलमध्येही आदिवासी विद्यार्थीनीवर लैंगिक अत्याचार झाल्याने आज शहरातून विराट आदिवासी भिल्ल जन आक्रोश मोर्चा निघाला. सदर मोर्चात हजारोंच्या संख्येने आदिवासी भगिनी आणि बांधव सहभागी झाले होते. यात तरूणांची संख्या लक्षवेधी होती.

शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीपासून जन आक्रोश मोर्चास सुरुवात झाली. सदर मोर्चा पारोळा रोड मार्गे जुनी महापालिका, झांशी राणी चौक, नवी महापालिका, साक्रीरोडमार्गे क्युमाईन क्लब येथे पोहोचला. तिथे समाजाच्या नेत्यांनी मोर्चेकर्यांना संबोधित केले. त्यानंतर शिष्टमंडळाच्यावतीने प्रशासनाला मागण्यांचे निवेदन देण्यात आले. मणिपूरात आदिवासी भगिनींची विवस्त्र धिंड काढण्यात आली. तसेच एरंडोल तालुक्यातील खडके बु येथे आदिवासी विद्यार्थीनींवर लैंगिक अत्याचार करण्यात आला. दोन्ही घटनेतील पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी आदिवासी समाज एकवटलेला दिसून आला. जन आक्रोश मोर्चात मोठ्या संख्येने जिल्ह्यातून महिला आणि तरुणांनी सहभाग घेतला होता. यावेळी शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. विशेष म्हणजे या जनआक्रोश मोर्चाने गर्दीचा नवीन विक्रम रचला. हातात लाल-निळे निषाण! मोर्चेकर्यांच्या हातात घोषणांचे फलक, भगवान एकलव्य यांचे चित्र असलेले लाल झेंडे आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा असलेले निळे झेंडे होते. तर गर्दीत काहींच्या हातामध्ये तिरंगा ध्वज होता. मोर्चादरम्यान जमाव नियंत्रित रहाण्यासाठी पोलीस दलाने विशेष खबरदारी घेतली होती. यासाठी अतिरिक्त कुमक रस्त्यावर उतरविण्यात आली होती. सुदैवाने जनआक्रोश मोर्चा शांततेने मार्गस्थ झाला. मणिपुरच्या घटनेतील दोषींना तात्काळ फाशी देण्याची मागणी मोर्चेकर्यांनी केली आहे.

# रान झालं ओसाड : शब्दांचा औत्या झाला मातीआड

## ना. धों. महानोर यांचे निधन

महाराष्ट्राला पडलेलं एक सुरेख निसर्गस्वप्न अशी ज्यांची ओळख करून दिली जाते अशा ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांनी जगाचा निरोप घेतला. गुरुवारी, (३ ऑगस्ट २०२३) पुण्यातल्या रूबी हॉल क्लिनिकमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. उपचारांदरम्यानच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. निधनासमयी ते ८० वर्षांचे होते.

महानोरांचा जन्म महाराष्ट्रातल्या वर्तमान औरंगाबाद जिल्ह्यातील पळसखेड या गावी झाला. त्यांचे शालेय शिक्षण पळसखेड, पिंपळगाव, शेंदुर्णी येथे झाले. त्यानंतर जळगावातील महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला; मात्र त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण पहिल्या वर्षापर्यंतच झाले. महाविद्यालयीन शिक्षण सोडून शेती करायला ते आपल्या गावी परतले . मराठी साहित्यविश्वात ते 'रानकवी' म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कवितांवर बालकवींचा प्रभाव जाणवतो. एकाहून एक सरस गीतरचनांसाठी महानोरांनी सर्वांच्या मनाचा ठाव घेतला. त्यांची अनेक गीतं आजही रसिकांच्या मनाचा ठाव घेतात. कवी, गीतकार, शेतकरी, माजी आमदार अशी त्यांची चतुरस्र ओळख. बालकवी आणि बहिणाबाईंचा वारसा समृद्ध करणारे कवी अशी त्यांची महाराष्ट्राला ओळख आहे. असा हा हरहुन्नरी कवी आज आपल्यात नसला तरीही त्यांचे शब्द मात्र कायमच आपल्यासोबत असणार आहेत. ना. धों. महानोर यांच्या 'रानातल्या कविता'ना खरा मातीचा गंध यायचा. त्यांच्या गीतांमधून-कवितांमधून निसर्गाचं खऱ्या अर्थाने दर्शन घडायचं. त्यांनी जशी निसर्गाची वर्णन करणारी गीतं लिहिली, तशा ठसठेबाज लावण्याही लिहिल्या. श्रावणातल्या उन्हाचा कोवळेपणा आणि स्त्रीचा नाजूकपणा एकत्रितपणे दर्शवणारी कवी ना.धों. महानोर यांची 'श्रावणाचं ऊन्ह मला झेपेना' ही लावणी लोकप्रिय झाली. आशा भोसले यांनी 'एक होता विदूषक' या चित्रपटासाठी गायली आहे.महानोर यांनी आपल्या साहित्यात काहीवेळा मराठीच्या बोलीभाषांचा वापर केला आहे.



शोध बातमी

**पुरुषोत्तम पाटील**
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०११२६

### शेती हे पहिलं प्रेम

एका वृत्तपत्राला मुलाखत देताना महानोर त्यांच्या शेतीच्या प्रेमाबद्दल बोलले होते. ते वयाच्या अठराव्या वर्षापासून शेती करत होते. शेती हे त्यांचं पहिलं प्रेम आहे असं ते म्हणायचे. सुमारे ४० वर्षांपूर्वी त्यांनी पळसखेड्याला २६ सिमेंट बंधारे, २६ दगडी बंधारे, ३ तलाव बांधून घेतले होते. त्यांनी माती अडवली, पाणी जिरवलं, शेतीच्या विकासातला तो आजही महत्त्वाचा प्रयोग मानला जातो. मी दिखावेगिरी करत नाही काम करतो असं ते म्हणायचतो. सव्वा लाख रुपयांत शेतकरी सन्मानाने कसा उभा राहू शकतो याचा मार्ग त्यांनी 'शेती आत्मनाश व नवसंजीवन' या पुस्तकाद्वारे केला होता. त्यांची पुस्तकं वाचून मुंबई पुण्यातील शेतकरी गावात येऊन शेती करू लागले होते. महानोरांच्या अनेक कविता शेतकऱ्यांना तोंडपाठ होती.



### निसर्गगीतांची खाण

**निसर्गगीतं आणि कविता म्हणजे ना.धो. महानोर हे एक समीकरणच महाराष्ट्रात तयार झालं आहे. त्यांनी रचलेली कितीतरी गीतं महाराष्ट्राच्या प्रत्येक नागरिकाच्या ओठी आहेत. वानगीदाखल सांगायचं तर, 'नभ उतरू आलं.' 'आम्ही ठाकर ठाकर' 'घन ओथंबून येती', 'चिंब पावसानं रान झालं', 'जांभूळ पिकल्या झाडाखाली' अशी अनेक गाणी वर्षानुवर्षं रसिकांच्या ओठी आहे. 'मी गाताना गीत तुला लडिवाळा' ही अंगाईसुद्धा त्यांनी लिहिली.**

### रोखठोक राजकीय भूमिका

१९७८ साली राज्यपाल नियुक्त आमदार म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. कला आणि शेती तज्ज्ञ क्षेत्रातून त्यांची विधानपरिषदेवर नियुक्ती झाली होती. साहित्य, कलावंतांचं ते प्रतिनिधी होते. यशवंतराव चव्हाणांमुळे माझी नियुक्ती झाली होती असं ते म्हणाले होते.

### मान्यवरांची श्रद्धांजली

ना.धों.महानोर यांना अनेक मान्यवरांनी आणि नेत्यांनी श्रद्धांजली वाहिली आहे. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी एक ट्विट केलं आहे. ते म्हणतात, ना. धों ची विधान परिषदेतील भाषणे देखील माणसाच्या काळजाचा ठाव घेत. ना. धो. खूपच हळवे, त्यात पत्नीच्या निधनाने ते आणखी खचले. मी , प्रतिभा त्यांच्या खचलेल्या मनाला उभारी देत राहिलो. पण अखेर हा वृक्ष उन्मळून पडला. ना. धो. चे निधन देखील पावसाळ्याच्या दिवसांत व्हावा हा योग मनाला चटका लाऊन जाणारा आहे. मी आणि माझ्या कुटूंबांतर्फे या मृदू मनाच्या निसर्ग कवीला श्रद्धांजली अर्पण करतो.

## हिंसेमागे विद्वेष

कथित आर्थिक प्रगतीने देश विकसित होणार नाही. देशात सौहार्दाचे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी मुख्यत्वे सरकारची आहे. स्वयंघोषित गो रक्षकांना जरब बसवणे त्यांचे काम आहे.हरयानातील नूह हे गाव देशाच्या इतर भागांत माहीत असण्याचे कारण नाही; पण गेल्या महिन्याच्या अखेरीस ते अचानक देशभर माहीत झाले. कारण तेथे मोठा हिंसाचार उसळला. या हिंसाचारात किमान सहाजण मृत्युमुखी पडल्याचे वृत्त आहे. राजधानी नवी दिल्लीच्या उंबरठ्यावर, गुरुग्राम येथे एका मशिदीवर हल्ला झाला आणि तेथील इमामाची हत्या करण्यात आल्याचेही वृत्त आहे. नूह येथे दरवर्षी प्रमाणे बृजमंडल जलाभिषेक यात्रा आयोजित करण्यात आली होती. या यात्रेवर दगडफेक सुरू झाली, गोळीबारही झाल्याचे वृत्त आहे. ही बातमी पाहता पाहता सर्वत्र पसरली. आणि बेफाम जमावाने दगडफेक व जाळपोळ सुरू केली. हिंसाचारात दोन पोलिसांसह तीनजण त्या दिवशी बळी पडले. दगडफेक का सुरू झाली, कोणी सुरू केली हे अजून स्पष्ट झालेले नाही; पण या घटनेमागे धार्मिक विद्वेष असावा असे मानण्यास वाव आहे. हरयानामध्ये तथाकथित गो रक्षकांचा धुमाकूळ सुरू आहे. त्याला कोणी आवर घालू शकलेले नाही ही खेदाची बाब आहे. गेल्या फेब्रुवारीमध्ये राजस्तानात दोन जणांना ते गोमांसाची वाहतूक करत असल्याच्या संशयावरून गो रक्षकांनी पळवून नेले व त्यांची हत्या केली. त्यातील मुख्य आरोपी हरयानात उजळ माथ्याने वावरत आहे. हेही या हिंसाचारामागचे एक कारण असू शकते. या हिंसाचारामागे मोठा कट असल्याचा आरोप हरयानाचे मुख्यमंत्री मोहनलाल खट्टर यांनी केला आहे. येथे भारतीय जनता पक्ष व जननायक जनता पक्ष यांचे सरकार आहे. या यात्रेच्या संयोजकांनी प्रशासनास पूर्ण माहिती दिली नाही असा तक्रारीचा सूर जननायक जनता पक्षाचे प्रमुख व राज्याचे उपमुख्यमंत्री दुष्यंत चौटाला यांनी लावला आहे. ही यात्रा विश्व हिंदू परिषद व बजरंग दल यांनी आयोजित केली होती. या दोन्ही संस्था-संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित आहेत व रा.स्व. संघ ही भाजपची मातृसंस्था आहे. म्हणजे चौटाला यांनी भाजपवर अप्रत्यक्ष टीका केली आहे. अर्थात ही वेळ राजकारण करण्याची नाही. हिंसाचार घडवणार्यांना, मग ते कोणत्याही समुदायाचे असोत, शोधणे व त्यांना कठोर शिक्षा करणे यास आता प्राधान्य दिले पाहिजे. राजस्तानातील घटनेमागचा मुख्य आरोपी मोहित यादव उर्फ मोनु मानेसर अजूनही पोलिसांना सापडलेला नाही, किंबहुना त्याला पोलिसांचे संरक्षण मिळत असल्याचेही बोलले जाते. तो हरयानातील बजरंग दलाच्या गो रक्षक विभागाचा प्रमुख आहे. समाज माध्यमांवर त्याचे अनुयायी मोठ्या प्रमाणात आहेत. जलाभिषेक यात्रेत आपण व आपले सहकारी सहभागी होणार असल्याचे मोनुने एका चित्रफिती द्वारे जाहीर केले होते. हे देखील हिंसाचार सुरू होण्याचे कारण असू शकते, असे काही पोलिस अधिकार्यांचे म्हणणे आहे. हरयानाचे पोलिस या हिंसाचाराची व त्यातील मोनुच्या भूमिकेची चौकशी एका विशेष तपास पथकामार्फत करणार आहेत; पण फेब्रुवारीपासून तो पोलिसांच्या हाती का लागत नाही हा प्रश्न अनुत्तरित आहे. अल्पसंख्याक समाजास लक्ष्य करणारी विद्वेषपूर्ण भाषणे जाहीररीत्या दिली जात असल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने दु:ख व्यक्त केले, राज्य सरकारांना समज दिली, तरीही समाज माध्यमांतून विद्वेष पसरवला जात आहे. त्याला आवर कोण व कसा घालणार याही प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. केंद्रात व हरयानात भाजप सत्तेत आहे. द्वेष पसरवणार्यांची गय केली जाणार नाही, असा स्वच्छ संदेश या पक्षाने दिला पाहिजे. त्यासाठी कठोर कारवाई केल्याचे समाजास दिसले पाहिजे. भाजप व संघ परिवार यांच्या एकत्रित शक्तीपुढे विरोधी पक्ष केविलवाणे दिसत आहेत. धर्मनिरपेक्षतेची मागणी करणार्यांची सरकार पक्षाकडून टर उडवली जात आहे. अशा स्थितीत धार्मिक सलोखा व सामंजस्य कोण, कसे निर्माण करेल? अशा घटनांमुळे वाढती बेरोजगारी, महागाई अशा मुख्य समस्यांवरून जनतेचेही लक्ष दूर होते. धार्मिक श्रेष्ठतेचा मुद्दा पुढे येतो, किंवा तो हेतू पुरस्सररीत्या पुढे केला जात आहे. सत्ताधारी पक्षाचे व सरकारचे जे प्रमुख आहेत त्यांनी पुढाकार घेऊन परिवाराला आवरणे आवश्यक आहे, अन्यथा विद्वेष आणखी बळी घेत राहील.

# उमद्या कलादिग्दर्शकाची चटका देणारी एक्झिट



मराठी चित्रपटसृष्टी नव्हे, तर बॉलिवूडच्या दुनियेत स्वत:चा वेगळा ठसा उमटविणाऱ्या सुप्रसिद्ध कलादिग्दर्शक नितीन देसाई(छळींळप ऊशीरळ) यांची अशी एक्झिट अपेक्षित नव्हती. त्यांनी आत्महत्या करून जीवनयात्रा संपवली. कलाक्षेत्रात स्वत:च्या हिमतीवर आपली ओळख निर्माण केली होती. त्यांच्या कलादिग्दर्शनामुळे अनेक चित्रकलाकृतींनी वेगळी उंची गाठली. त्यांचा कलाकृतीला स्पर्श म्हणजे मिडास स्पर्श होता. असा हा हरहुन्नरी कलावंत आपल्याला अचानक सोडून जाईल, अशी कल्पनाही कोणीही केली नव्हती. मात्र त्यांच्या आत्महत्येमुळे चित्रपटसृष्टीसह सर्वच क्षेत्रांत शोककळा पसरली. हिंदी चित्रपटसृष्टी आणि कलेच्या क्षेत्रात नितीन देसाईंसारख्या मराठी तरुणाने आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले, याचा महाराष्ट्राला अभिमान होता.

हिंदी चित्रपटसृष्टीसारख्या झगमगाटात राहूनही विनम्र स्वभाव आणि त्यांचे वागणे साधे अनेकांना भावत होते. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी सर्जनशीलतेची छाप उमटवणाऱ्या नितीन देसाईंच्या जाण्याने भारतीय कलासृष्टीचे अन् महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले आहे. नितीन देसाई(छळींळप ऊशीरळ) यांनी २००५ मध्ये मुंबईलगतच्या कर्जत येथे ५२ एकर (२१ हेक्टर) परिसरात एनडी स्टुडिओ उभारला होता. सध्या ते आर्थिक अडचणीत होते आणि त्यांच्या कर्जतमधल्या एनडी स्टुडिओवर जप्तीच्या कारवाईची शक्यता होती, असे बोलले जात होते. देसाई यांनीवित्तीय संस्थेकडून १८० कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते; परंतु कर्जाची वसुली होत नव्हती. त्यामुळे ते कर्ज २४९ कोटी रुपयांवर गेले होते. आर्थिक अडचणींचा सामना करावा लागल्याने त्यांच्या आत्महत्या मागचे कारण असावे, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे.

नितीन देसाई यांचा जन्म कोकणातील दापोलीतील एका मराठी मध्यमवर्गीय घरात झाला होता. त्यांनी मुंबईतील जे. जे. स्कूलमधून फोटोग्राफीचे शिक्षण घेतले होते. एकदा ते चित्रपटाच्या सेटवर गेले आणि ते त्या क्षेत्राच्या प्रेमात पडले. कलादिग्दर्शक, प्रॉडक्शन डिझायनर, निर्माता असा त्यांचा प्रवास थक्क करणारा होता. अनेक चित्रपटांच्या निर्मितीत त्यांचे महत्त्वाचे योगदान होते. १९८७ सालापासून त्यांची सिनेमा कारकीर्द सुरू झाली. '१९४२ अ लव्ह स्टोरी' या सिनेमामुळे ते खऱ्या अर्थाने चर्चेत आले होते. त्यानंतर 'हम दिल दे चुके सनम', 'देवदास', 'लगान', 'जोधा अकबर', 'प्रेम रतन धन पायो' यांसारख्या सिनेमांचे त्यांनी कला दिग्दर्शन केले होते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक हिंदी, मराठी चित्रपटांमध्ये, इतिहासकालीन मालिकांमध्ये कलादिग्दर्शनाचे काम केले आहे.

भव्यदिव्य सेट, अनोखे कलादिग्दर्शन यासाठी त्यांची ओळख निर्माण झाली होती. मुंबईतल्या प्रसिद्ध लालबाग राजा गणपतीचा देखावा ते साकारायचे. त्यांच्या उत्तुंग कारकिर्दीमध्ये त्यांना चार वेळा सर्वोत्कृष्ट कलादिग्दर्शनाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता, तर ३ वेळा सर्वोत्कृष्ट कलादिग्दर्शनाचा फिल्मफेअर पुरस्कार त्यांच्या नावावर आहे. 'तमस' या दूरदर्शनवरच्या मालिकेपासून त्यांचा प्रवास सुरू झाला. त्यानंतर त्यांनी चाणक्य मालिकेसाठी कला दिग्दर्शन केले होते. '१९४२ अ लव्ह स्टोरी' या चित्रपटाने त्यांना खऱ्या अर्थाने ब्रेक दिला आणि त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. मराठमोळ्या माणसाने जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सर्मधून शिक्षण घेऊन आपल्या उपजत प्रतिभेच्या जोरावर बॉलिवूडच्या कलादिग्दर्शनाच्या विश्वात मोठे नाव कमावले, हे कौतुकास्पद वाटत होते. किंबहुना चित्रपटाच्या निर्मितीत आणि यशात कलादिग्दर्शनाचा वाटा किती मोठा असतो हे त्यांनी जगासमोर आणले. त्यांच्या या प्रवासाबद्दल सह्याद्रीला त्यांनी एक मुलाखत दिली होती. त्यातून त्यांनी मध्यमवर्गीय मराठी कुटुंबातील आठवणी आणि सांगितलेले किस्से कायम लक्षात राहणारे आहेत. मी ज्या घरात मोठा झालो, त्यावेळी सगळ्यांना वाटायचे की, आपल्या पोरांनी इंजिनीअर, डॉक्टर व्हावे. त्या काळात कला क्षेत्रात आणि त्यातही चित्रपट क्षेत्रात जायचे म्हणजे एक मोठे आव्हान होते. मात्र माझ्या आई-वडिलांनी मला पाठिंबा दिला. बीडीडी चाळीत लहानाचा मोठा झालो. ही त्यातील एक आठवण.

आपल्या कर्तृत्वाचा आलेख वाढवत प्रसिद्धीच्या शिखरावर असतानाही पाय जमिनीवर ठेवणाऱ्या या माणसाचा मराठीजनांनाही अभिमान वाटत होता. देसाईंनी कर्जतच्या ज्या स्टुडिओत एकाहून एक सरस भव्यदिव्य सेट उभारले, तिथेच त्यांनी मृत्यूला जवळ करून आपला जीवनप्रवास संपवला. सध्या त्यांनी एवढे टोकाचे पाऊल का उचलले? याचा तपास केला जात आहे. त्यांनी एकाएकी स्वत:ला असे का संपविले माहीत नाही; परंतु लोक कष्टाने, स्वयंप्रतिभेने स्वत:चे असे एक विश्व निर्माण करतात. पैसा, प्रसिद्धी त्यांच्या पायाशी लोळण घेते. पण एवढे सर्व ऐश्वर्य, वैभव प्राप्त झाल्यानंतर एकाएकी जगाचा निरोप घेतात, हे खरेच अनाकलनीय आहे.

# कर्नाटकमध्ये अस्थिरतेचे ढग?

धर्मनिरपेक्ष जनता दलाचे नेते एच. डी. कुमारस्वामी आणि भाजप नेते बी. एस. येडियुरप्पा यांनी कर्नाटकमध्ये(घरीपरींझर) सत्ताबदलाची शक्यता वर्तवली. मात्र भाजपचे ६६ आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाचे १९ आमदार एकत्र येऊन काँग्रेसचे सरकार पडू शकत नाही. अर्थात आपली कामे होत नसल्याची तक्रार पक्षाकडे करणाऱ्या काँग्रेस आमदारांची संख्या तीसच्या घरात असल्यामुळे कर्नाटकमध्ये एखादे वादळ येऊ घातले आहे का? हे तपासून पाहावे लागेल.

कर्नाटकमध्ये(घरीपरींझर) गेल्या अनेक वर्षांनंतर प्रथमच बहुमत मिळून एखादा राजकीय पक्ष सत्तेवर आला आहे. असे असताना हे सरकार जास्त वेगाने काम करेल, अशी अपेक्षा असायला हवी. भारतीय जनता पक्षाच्या नकारात्मक कामगिरीच्या जोरावर सत्तेत आलेल्या काँग्रेसने निवडणुकीमध्ये लोकानुनयाच्या भरपूर घोषणा केल्या होत्या; परंतु आता त्या प्रत्यक्षात आणताना सरकारची कसरत होत आहे. त्यातच सरकार सत्तेत आल्यानंतर काही दिवसांमध्येच माजी मुख्यमंत्री कुमारस्वामी यांनी हे सरकार लवकरच कोसळेल, असे भाकीत केले. महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जशी फूट पडली, तशी फूट पडेल, अशी भविष्यवाणीही केली. काँग्रेसला सत्ता मिळवता आली तरी टिकवता येत नाही, हे मध्य प्रदेश, कर्नाटक, अरुणाचल प्रदेश आदी राज्यांमधील उदाहरणांवरून वारंवार स्पष्ट झाले आहे. विकले जाणारे असले तर विकत घेणाऱ्यांचे काम सोपे होते. लोकशाहीमध्ये आमदारांचा बाजार मांडला जातो. त्यात विकत घेणारे आणि विकले जाणारे दोघेही दोषी असतात. एकट्या विकत घेणाऱ्याला दोष देऊन चालत नाही. अर्थात त्यामुळे विकत घेणारा दोषी नसतो, असे नाही. कर्नाटकमध्ये काँग्रेसचे सरकार प्रचंड बहुमताने स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्री एस. सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यातील भांडणाच्या बातम्या चर्चेत आहेत. याचे पर्यावसान सरकार पडण्यामध्ये होणार नसले तरी दखलपात्र राजकीय अस्वस्थता निर्माण होत आहे, हे महत्त्वाचे.

पक्ष सत्तेत आणण्यासाठी एकाने कष्ट करायचे आणि मुख्यमंत्रीपदाची माळ पडते दुसऱ्याच्या गळ्यात हे राजस्थान, मध्य प्रदेश आणि कर्नाटकमध्येच घडले असे नाही. काँग्रेसची ती परंपरा आहे. दरबारी राजकारण करणाऱ्यांना सत्तेची पदे मिळतात आणि मासबेस नेत्यांची कुचंबणा होते, हे राजेश पायलट, माधवराव शिंदे, ममता बॅनर्जी, शरद पवार आदींनी अनुभवले आहे. नव्या पिढीत हे दु:ख सचिन पाटलट, डी. के. शिवकुमार, ज्योतिरादित्य शिंदे, हेमंत बिसवा सरमा यांच्या वाट्याला आले. कर्नाटकमध्ये मुख्यमंत्रीपदावर डी. के. शिवकुमार यांचा अधिकार असताना सिद्धरामय्या यांना पुन्हा संधी देण्यात आली. दोघांमध्ये एकमत घडवून डी. के. शिवकुमार यांना उपमुख्यमंत्री केले असले, तरी त्या दोघांमधील शीतयुद्धाची चर्चा अजूनही होत आहे. लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात नेतृत्वबदल होऊ शकतो, असेही बोलले जात आहे. या सर्व अटकळींच्या दरम्यान, कर्नाटकमधील एका दिग्गज काँग्रेस नेत्याने आपल्याच सरकारची खिल्ली उडवली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बी. के. हरिप्रसाद अलीकडेच म्हणाले की, त्यांना मुख्यमंत्री कसे करायचे आणि पाडायचे हे माहीत आहे. मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने नाराज झालेल्या हरिप्रसाद यांनी आपल्या एका मागणीकडे दुर्लक्ष केल्याने मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्यावर नाराजी व्यक्त केली. हरिप्रसाद म्हणाले, की मी सिद्धरामय्या यांना फक्त एकच गोष्ट मागितली होती. करकला येथे चेन्नई थीम पार्क बनवण्यासाठी पाच कोटी रुपयांचे अर्थसाह्य करावे असे म्हटले होते. त्यांनी मला पैसे देण्याचे आश्वासनही दिले होते; पण काहीही केले नाही. मी भूपेश बघेल यांना मुख्यमंत्री केले. याचा अर्थ मला मुख्यमंत्री कसे करायचे हे माहीत आहे आणि त्यांना पाडायचे कसे हेदेखील माहीत आहे.


काँग्रेसच्या एका ज्येष्ठ नेत्याने राज्याच्या मुख्यमंत्र्यांवर केलेल्या या घणाघाती टीकेमुळे सत्ताधारी पक्षात खळबळ उडाली. यावर मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही; पण जी. परमेश्वर आणि डी. सुधाकर यांच्यासारख्या ज्येष्ठ मंत्र्यांनी हे हरिप्रसाद यांचे वैयक्तिक मत असल्याचे सांगून एकूण प्रकरण खोडून काढण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी दुसरीकडे डी. के. शिवकुमार यांनी कर्नाटकमध्ये प्रचंड बहुमत असूनही काँग्रेसचे सरकार पाडण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा दावा करून राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली. ते म्हणाले, 'मला माहीत आहे की काही लोक आमचे सरकार पाडण्याचा कट रचत आहेत. या वेळी त्यांनी सरकार पाडण्याचे केंद्र बंगळूरुऐवजी सिंगापूर येथे गेल्याचा आरोप केला. शिवकुमार म्हणाले, मला मिळालेल्या माहितीनुसार, भाजप आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाचे नेते करार करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांना बंगळूरु आणि दिल्लीमध्ये बैठका घ्यायच्या होत्या; पण ते करू शकले नाहीत. त्यामुळे त्यांनी सिंगापूरचे तिकीट बुक केले. शिवकुमार यांनी एकदा नव्हे, तर दोनदा सरकार पाडण्याचा मुद्दा उपस्थित केला होता. दुसरीकडे, भारतीय जनता पक्षाने हे सर्व आरोप फेटाळून लावले आणि म्हटले की, काँग्रेस आमदार बी. के. हरिप्रसाद यांच्या नाराजीपासून मीडिया आणि जनतेचे लक्ष वळवण्यासाठी हे सर्व दावे केले जात आहेत. राज्याचे माजी गृहमंत्री अरगा ज्ञानेंद्र म्हणाले की, काँग्रेस सरकार पाडण्यासाठी बाहेरच्या व्यक्तीची गरज नाही. काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या भांडणाकडे लक्ष वेधताना भाजप आमदाराने ही टीका केली.

हरिप्रसाद यांच्या वक्तव्यानंतर सिद्धरामय्या यांचे समर्थक आणि काँग्रेसच्या कर्नाटक युनिटचे सचिव वरुण महेश यांनी एक व्हीडिओ जारी केला. त्यात त्यांनी हरिप्रसाद यांना सिद्धरामय्या यांच्या विरोधात बोलल्याबद्दल कारणे दाखवा नोटीस बजावण्याची मागणी केली. सरकार स्थापनेच्या दोन महिन्यांमध्येच काँग्रेसमध्ये पक्षांतर्गत मतभेद सुरू झाले आहेत का? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी मात्र सत्ताधारी काँग्रेसमध्ये कोणत्याही प्रकारचा असंतोष नाही, असे स्पष्ट केले. शिवकुमार यांचे सरकार अस्थिर करण्याबाबतचे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा ३० हून अधिक आमदारांनी त्यांच्या मतदारसंघातील विकासकामे न झाल्याबद्दल चिंता व्यक्त करणारी पत्रे लिहिली आहेत.

आमदारांना पत्र लिहिल्याच्या दाव्यावर सिद्धरामय्या आणि शिवकुमार म्हणाले की, पक्षाच्या आमदारांमध्ये कामाबद्दल कोणतीही चिंता असल्याची तक्रार नाही. काही विकासकामांवर चर्चा करायची होती, विधानसभेचे अधिवेशन होते. आमच्या पाच हमी योजना लोकांपर्यंत पोहोचत आहेत की नाही, भ्रष्टाचार होत आहे की नाही याबाबत आम्ही आमदारांशी चर्चा करून मार्गदर्शन घेणार होतो; परंतु विधानसभेच्या अधिवेशनात वेळेच्या कमतरतेमुळे या सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी विधिमंडळ पक्षाची बैठक होऊ शकली नाही, असे स्पष्टीकरण शिवकुमार यांनी दिले. शिवकुमार यांनी सरकार अस्थिर करण्याबाबत केलेले भाष्य हवेतील नक्कीच नाही.

महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस फुटल्यानंतर माजी मुख्यमंत्री आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाचे नेते एच. डी. कुमारस्वामी यांनी महिनाभरात महाराष्ट्राप्रमाणे कर्नाटकमध्येही मोठी उलथापालथ होईल, असा दावा केला. माजी मुख्यमंत्री आणि भाजप नेते बी. एस. येडियुरप्पा यांनीही कर्नाटकमध्ये काहीही होऊ शकते, असे म्हटले. दोन्ही नेत्यांच्या या वक्तव्यामुळे घबराट निर्माण झाली होती. २२४ विधानसभा सदस्य असलेल्या कर्नाटकमध्ये बहुमताचा आकडा ११३ आहे. सध्या राज्यात भारतीय जनता पक्षाचे ६६ आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाचे १९ आमदार आहेत. हे दोघे मिळून केवळ ८५ चा आकडा गाठतील. हा आकडा बहुमताच्या ११३ पेक्षा खूपच कमी आहे. अशा परिस्थितीत भाजप आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाची युती झाली तरी काँग्रेसचे सरकार पडू शकत नाही. त्यामुळे बहुमत नसतानाही सरकार पडण्याची चर्चा हे नेते कशाला करतात, असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. कुमारस्वामी आणि येडियुरप्पा मानतात की, राष्ट्रवादीप्रमाणेच काँग्रेसमध्येही फूट पडली आणि असे काही झाले, तर कर्नाटकमध्येही राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता आहे. कर्नाटकमध्ये सध्या काँग्रेसचे १३५ आमदार आहेत. याशिवाय एका अपक्ष आमदाराने पक्षाला पाठिंबा दिला आहे. सरकार पाडण्यासाठी ११३ आमदारांचा पाठिंबा आवश्यक असल्यामुळे काँग्रेसचे तीस आमदार फुटून सत्तास्थापनेसाठी बाहेर पडल्याशिवाय उपयोग नाही. काँग्रेसकडे आजघडीला बहुमताच्या आकड्यापेक्षा २३ जागा जास्त आहेत. अर्थात पक्षाकडे तक्रार करणाऱ्या काँग्रेस आमदारांची संख्या तीसच्या घरात आहे, हेही विसरता येत नाही. कदाचित त्यामुळेच कर्नाटकमध्ये एखादे वादळ येऊ घातले आहे का, हे तपासून पाहावे लागेल.

## शब्दकोडे-१३९



**आडवे शब्द -** १. याचेच होते फुलपाखरू ४. डोंगरातील खाचाखोचा ७. मधमाशी (संस्कृत) १०. चविष्ट ११. जास्वंदीचा मूळ रंग १२. भांडण १३. बालिश, अपरिपक्व १५. पातळ खांब १७. दृष्टीभेट २०. 'सुवर्णा' याअर्थी मुलींचे एक नाव २१. शूर २३. बटाट्याचा सर्वपरिचित पण भाजणीचाही चांगला २४. मालक २५. पर्वा २६. चर्चा २८. खोडकर २९. नाजूक ३१. सोनेरी हरीण ३३. चेहऱ्यावरील तेज ३४. सत्व ३६. हिरवे ३७. गरजू ३९. गर्व म्हणजे थोडक्यात याची बाधा! ४०. समुद्र ४२. मुलगी ४३. निर्धन ४५. किल्ली, खटका ४६. प्रचंड, भारी ४८. जनन ४९. शारीरिक वा मानसिक वेदनेने अस्वस्थ होणे ५१. प्रामाणिक ५३. युद्धक्षेत्र ५५. पंकज ५६. अतिशय कृश माणसाला दिली जाणारी 'मत्स्याहारी' उपमा ६०. काढलेली सुट्टी ६१. मामाची बायको ६२. जगरूढी ६४. तमाशातील कलाकार ६७. श्वापद ६९. गोडी ७१. कांद्याचे पान ७२. मूळ अर्थ परवानगी, आता सुट्टी! ७३. प्रहार, आघात ७५. याचे चक्र कधीही उलट फिरवता येत नाही ७६. हळदीचा अधिक उष्ण व सुगंधी प्रकार ७७. गीत गायन ७८. कायदेशीर ८१. गवत ८३. जवळीक, घनिष्ठ संबंध ८४. अथर्वशीर्ष इ. गणपती स्तवन ८५. उलट, विरुद्ध

**उभे शब्द -** २. फसविणारा ३. प्रफुल्लित ४. उसाचे आडवे तुकडे ५. विद्या ६. संगोपन ७. कामदेव ८. देव्हारा ९. कर्णोपकर्णी १२. वाहणारी हवा १३. पूर्वीच्या 'बघण्याच्या' कार्यक्रमातील पदार्थ १४. ठाकरे परिवाराने चालवलेला खोपोली येथील वृद्धाश्रम १६. धोक्याचा इशारा १८. चित्रकलेचे रंग तयार करण्यासाठी फक्त याचेच तेल वापरतात १९. वजनदार २२. रमापती २४. टक्कर २६. पण-परंतु (हिंदी) २७. चलाख, हुशार २९. काळा असला तरी उगाळून संपतो! ३०. उत्कर्षाचा काळ ३२. शिकार ३५. नटवणे ३८. बंगाल ४१. हत्ती ४२. हात धुण्याचे पात्र ४४. भक्कम, मजबूत ४५. मुंबईची ओळख असणारा वास्तुप्रकार ४७. प्रवासी पोळी, दसऱ्याची तिथी ४८. शेजारी शेजारी ५०. तारेवरची तारांबळ ५१. सामोपचार ५२. असा आनंद चांगला नाही! ५४. मौज करणे ५५. अंगरखा ५७. काटकसर ५८. कापसाचे फळ ५९. न्यारी चव ६३. पुरुष ६५. शिक्षा ६६. पाठवणी ६८. पाठ फिरवणे ७०. च्या बरोबर ७१. रस्त्यावर पहिला हक्क यांचा ७४. दात ७७. थंड ७८. बोच, ठणका ७९. ढीग ८०. पुढे 'शास्त्र' जोडल्यास फसवेगिरीच अधिक! ८२. रात्र, रजनी

### शब्दकोडे १३८ चे उत्तर

आडवे उत्तर

१.हवालदार ६.आतेभाऊ ९.जड १०.रस ११.मामलतदार १५.रन १६.हरकत १८.वग १९.जबडा २१.मनोहर २२.वाकडातिकडा २४.रज २५.मसलत २७.दलाई लामा ३६.नेम ३८.वदन ४०.रामलीला ४२.हर ४४.देहदान ४६.करुण ४७.विनवणी ४९.हर्ष ५०.सहल ५२.आर ५३.वानर ५५.कस ५७.तरतरीत ५९.दारोदार ६०.रामरक्षा ६२.पाल ६३.सदन ६४.मास ६५.तलवार ६७.आज ६८.बारीकसारीक ७१.नट ७२.पर ७३.रंग ७५.पद ७७.चाकरमानी ८०.भरजरी ८१.रचना ८२.लटलट ८३.रज

उभे उत्तर

१.हरहर महादेव २.वासर ३.दामात ४.रम ५.औंदा ७.तेरडा ८.भान ९.जवाहरलाल नेहरू १२.लवकर १३.तगडा १४.रजक १७.कमालकिमान २०.बडा २१.मजला २३.तिन्हीसांज २४.रदबदली २६.तसा २९.नद ३१.डावरा ३३.रोमहर्षक ३५.मला ३७.रमण ३९.दशानन ४१.महाल ४३.पाणी ४४.देह ४५.नस ४६.करतल ४७.विवाहसमारंभ ४८.वरदान ५१.हजरत ५२.आरपार ५४.गोदावरी ५६.सरासरी ५८.तनुज ६१.क्षालन ६४.मासा ६६.वाटचाल ६७.आरमार ६८.बाजरी ६९.कपार ७०.कप ७२.पर ७४.गर ७६.दल ७८.कट ७९.नीज

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय -** फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय -** शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय -** बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# प्रभाग २४ मधील रस्त्यांसह विविध विकासकामांना मंजुरी द्या

### शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनच्या शिष्टमंडळाने घेतली आयुक्तांची भेट

नाशिक । प्रतिनिधी



आरडी सर्कल ते बाजीरावनगर हा रस्ता २४ मीटर रूंदीचा करावा, कर्मयोगीनगर ते भामरे मिसळ हा रस्ता विकसित करावा, चार एकरमध्ये पार्क विकसित करावे, यासह प्रभाग २४ मधील विविध विकासकामांच्या मागण्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष व सत्कार्य फाउंडेशनने केल्या आहेत. याबाबतचे निवेदन शिष्टमंडळाने बुधवारी, २ ऑगस्ट रोजी महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अशोक करंजकर यांना दिले.

सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड (देशमुख), शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड (देशमुख) यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने बुधवारी आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांची भेट घेवून निवेदन दिले. कर्मयोगीनगरहून बडदेनगर ते पाटीलनगर या रस्त्याला जोडणारा (भामरे मिसळ ते रणभूमी) या रस्त्याच्या प्रस्तावाला मंजुरी द्यावी. विकास आराखड्याप्रमाणे आरडी सर्कल ते बाजीरावनगर हा रस्ता २४ मीटर रुंदीचा करून नंदिनी नदीवर पूल बांधावा, उर्वरित जागेत जॉगिंग ट्रॅक विकसित करा. उखडलेल्या रस्त्यांचे खडीकरण करून, पावसाळ्यानंतर डांबरीकरण करावे. सीएसआर फंडातून इंडिगो पार्क येथील जॉगिंग ट्रॅक विकसित करण्याचे काम सुरू करावे. प्रभागात पर्जन्यवाहिन्या टाकाव्यात. सभागृहांची दुरूस्ती करून नूतनीकरण करावे. बंद असलेली सभागृह ज्येष्ठ नागरिक व महिलांना योगा, प्राणायाम व व्यायामासाठी खुली करून द्यावीत. गोविंदनगर येथील सर्व्हे नंबर ७८८ जवळील डीपी रोडवर नंदिनी नदीवर पूल बांधण्याचा प्रस्ताव मंजूर करावा. प्रभागातील उद्यानांची दुरुस्ती करावी. कर्मयोगीनगर येथे सर्व्हे नंबर ९९२-९९३ मध्ये चार एकर क्षेत्र पार्कसाठी आरक्षित करण्यात आले आहे, येथे पार्क विकसित करावे, सध्या सुमारे एक एकर क्षेत्र महापालिकेच्या ताब्यात असून, प्रथम ते विकसित करण्यासाठी कार्यवाही करावी आदी मागण्या या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांनी दिले. यानंतर शहर अभियंता नितीन वंजारी यांचीही भेट घेण्यात आली. यावेळी सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड (देशमुख), शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड (देशमुख), बाळासाहेब मिंधे, ॲड. ललित निकम, संगिता देशमुख, प्रभाकर खैरनार, बापूराव पाटील, डॉ. शशीकांत मोरे, वसंत चौधरी, विनोद पोळ, मालती कोलते, मिनाक्षी पाटील, देवयानी खैरनार, लता चौधरी, वंदना पाटील, उज्ज्वला सोनजे, संकेत गायकवाड (देशमुख) आदींसह रहिवाशी हजर होते.

# स्वराज्यतर्फे महिलांना नॅपकीन बुके, राखी मेकिंग, पेपर बॅग, फॅशन डिझाईनचे प्रशिक्षण



### नाशकात शहरात वेगवेगळ्या ठिकाणी करण्यात आले आयोजन

नाशिक । प्रतिनिधी

स्वराज्य प्रमुख संभाजी महाराज स्वराज्य संपर्कप्रमुख तथा प्रवक्ते करण गायकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच उत्तर महाराष्ट्र महिला आघाडी अध्यक्ष मनोरमा पाटील व महाराष्ट्र कोर कमिटी सदस्य पुष्पा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली स्वराज्य प्रमुख छत्रपती संभाजी महाराज यांनी दिलेल्या आदेशाने स्वराज्याचा प्रत्येक पदाधिकारी हा सक्षम व्हावा यासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले.

या माध्यमातून नाशिक जिल्ह्यामध्ये महिलांसाठी मोठ्या प्रमाणात मोफत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन वेगवेगळ्या ठिकाणी केले जात आहे. यामध्ये महिलाही मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन या प्रशिक्षणाचा फायदा घेत आहेत. यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी राखी मेकिंग, पेपर बॅग, फॅशन डिझाईन, नॅपकिन बुकेचे प्रशिक्षण देण्यात आले. उद्योजक आघाडी महानगरप्रमुख मीनाक्षी पाटील व नाशिक महानगरप्रमुख निशिगंधा पाटील यांनी प्रशिक्षण दिले. ज्या महिला राख्या बनवणार आहेत त्या राख्यांसाठी स्वराज्य पक्षाच्या वतीने काही महिलांना स्टॉल उभे करण्यासाठी मदत केली जाणार आहे. या वेगवेगळ्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून जास्तीत-जास्त महिलांनी या प्रशिक्षण शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहनही स्वराज्य पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. माडसांगवी, दिंडोरी, जेलरोड, नाशिकरोड, जत्रा हॉटेल, आडगाव या ठिकाणी विविध प्रकारच्या घेतलेल्या प्रशिक्षणाला या विभागातील महिलांनी चांगला प्रतिसाद दिला. या प्रशिक्षणाचे आयोजन महिला आघाडी जिल्हाप्रमुख सुलक्षणा गवळी, जिल्हा संपर्कप्रमुख रेखा पाटील, जिल्हा संघटक रेखा जाधव, मुक्ता खोडे, रेणुका पेखले, रागिनी आहेर, नंदा चव्हाण, पूजा चव्हाणके, नेहा नाठे, काजल देवरे, श्वेता गुंजाळ त्यांनी केले होते.

# श्रीमोहिनीराज भक्त मंडळातर्फे विष्णूयागात भाविकांचा सहभाग

नाशिक । प्रतिनिधी



पुरुषोत्तम मासानिमित्त श्रीमोहिनीराज भक्त मंडळातर्फे काल गुरुवारी ( दि.३) विष्णू यागाचे आयोजन करण्यात आले. रामसेतू समोर श्री शुक्ल यजुर्वेद मंदिरात सकाळी ९ वाजता प्रारंभ झाला. वेदशास्त्रसंपन्न भालचंद्रशास्त्री शौचे व सहकारी ब्रह्मवृंदाने आचार्यपद भूषवून पौरोहित्य केले. मंडळाचे अध्यक्ष किशोर गायधनी यांनी स्वागत केले. त्यांच्यासह अनेक दाम्पत्याने विष्णू यागात सहभाग घेतला.

विष्णू यागाच्या यजमानपदी किशोर गायधनी, प्रकाश पारनाईक (डोंबिवली ), सुशांत गायधनी, पद्माकर शौचे, सागर गायधनी, उमाकांत शौचे, किरण जोशी, रवींद्र गायधनी, प्रशांत जोशी, कल्पेश देव, उपेंद्र शुक्ल, राजीव जोशी, गिरीश शुक्ल, प्रदीप जोशी, कल्पेश शिंगणे आदी भाविक उपस्थित होते. महिलांनी तुलसीअर्चन, कुंकुमार्चन, हिरण्यार्चन व सामूहिक मोहिनीराज स्तोत्र पठण केले. यावेळी मोठया संख्येने लांबलाबून आलेले भक्त सहकुटुंब उपस्थित होते. रात्री महाप्रसादाचा लाभ घेऊन विष्णूयागाची सांगता झाली.

# भाजपा महानगरतर्फे अण्णाभाऊ साठे, लोकमान्य टिळक यांना अभिवादन

नाशिक । प्रतिनिधी



भारतीय जनता पार्टीच्या अनुसूचित जाती मोर्चातर्फे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी वसंतस्मृती कार्यालयात संपन्न झाली. यानिमित्त या दोघांना अभिवादन करण्यात आले.

नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव, आ. सीमा हिरे, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष गणेश कांबळे, भाजपा अनु.जाती मोर्चा शहराध्यक्ष शशांक हिरे, कुंदन खरे, देवदत्त जोशी, योगेश हिरे, संतोष नेरे, गणेश नाईक, अभय छल्लाणी, राकेश पाटील, अरुण शेंदुर्णीकर, चंद्रकांत थोरात, वसंत उशीर, उदय जोशी, हेमंत शुक्ल, जितेंद्र चोरडिया, रश्मी बेंडाळे, विनोद येवले, काशिनाथ शिलेदार, नामदेव हिरे, लक्ष्मण पगारे, मदन निकम, अनिल मोरे, योगेश मोरे, अनिल मोरे, कविता तेजले, गजानन रानबावळे, भास्कर घोडेकर, पांडुरंग सावजी आदी उपस्थित होते. नाशिक शहराध्यक्ष प्रशांत जाधव, आ. सीमा हिरे, भाजपा अनु.जाती मोर्चा शहराध्यक्ष शशांक हिरे यांच्या हस्ते लोकमान्य टिळक व साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

ॲड. जी. एस. पाटील
निशाणी नं.६

जाहिर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. व. स्तर यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.- ८७६/२०२३

१) हेमलता देवेंद्र गुरव,
२) सागर देवेंद्र गुरव,
३) कुणाल देवेंद्र गुरव, ........अर्जदार
।। विरुध्द ।।
कोणीही नाही .....जाबदेणार
कै. देवेंद्र तुळशीदास गुरव ........ मयत

ज्या अर्थी अर्जदार क्र. १ ते ३ यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर सो.यांचे न्यायालयात दिनांक १५/०७/२०२३ रोजी दिवाणी किरकोळ अर्ज नं. ८७६/२०२३ चा बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम VIII प्रमाणे वारस दाखला मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. मयत कै. देवेंद्र तुळशीदास गुरव यांच्या निधनानंतर अर्जदार यांना शासकीय व इतर निमशासकीय कामांसाठी मयत कै. देवेंद्र तुळशीदास गुरव यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळणेकामी मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशी कामकाज चालविणेकरीता दिनांक ३१/०८/०२०२३ रोजी निश्चित केले आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही सह वाद, हरकत असल्यास धुळे येथील मे.सह दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार उपस्थित झाली नाही. तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस मे. न्यायालयाचे शिक्क्यानिशी आमचे सहीनिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक :- १८/७/२०२३ आदेशावरुन

(शिक्का)

कामगिरी कारकून, दिवाणी न्यायाधीश व.स्तर, धुळे
अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश व.स्तर, धुळे

# नाशिक लोकसभा,विधानसभेच्या क्षेत्र समन्वयकपदी पालवे

नाशिक । प्रतिनिधी



नाशिक जिल्हा ग्रामीण तसेच नाशिक महानगर शहराध्यक्ष यशस्वी कामगिरी बजावल्यानंतर गिरीश पालवे यांची नाशिक लोकसभा व त्या अंतर्गत सहा विधानसभाचे क्षेत्र समन्वयक म्हणून निवड करण्यात आली आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल त्यांनी राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ना. गिरीश महाजन, उत्तर महाराष्ट्र प्रभारी व प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, महाराष्ट्र प्रदेश मुख्यालय प्रभारी रवी अनासपुरे यांचे त्यांनी आभार मानले आहे. नाशिक महानगर भाजप कार्यालयात त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचा नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव व प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी व पदाधिकाऱ्यांनी सत्कार केला. त्यांच्या या निवडीबद्दल केंद्रीय कुटुंब कल्याण व आरोग्य राज्यमंत्री भारती पवार, नाशिक नाशिक शहर भाजपा अध्यक्ष प्रशांत जाधव, जिल्हा ग्रामीण अध्यक्ष सुनील बच्छाव, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, आ. सीमा हिरे, आ. देवयानी फरांदे, आ. राहुल ढिकले, नाशिक लोकसभा निवडणूक प्रमुख केदा आहेर, दिंडोरी लोकसभा निवडणूक प्रमुख बाळासाहेब सानप, नाशिक महानगर व जिल्हा प्रभारी राजेंद्र गावित, भाजप ज्येष्ठ नेते विजय साने, प्रदेश मुख्य सह प्रवक्ते अजित चव्हाण, प्रदेश प्रवक्ते प्रदीप पेशकर, प्रदेश प्रवक्ते गोविंद बोरसे व प्रवीण आलई पवन भगूरकर, सुनील केदार, जगन पाटील, सुनील देसाई, आदींसह प्रदेश पदाधिकारी नाशिक महानगरातील विविध मोर्चा व आघाड्यांचे पदाधिकारी तसेच नाशिक महानगरातील व नाशिक ग्रामीणचे पदाधिकारी यांनी सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

CHANGE NAME

I Have Change My Name From:
MANISHA NIMBA DESALE
To
MINAKSHI NIMBA PATIL
Address:A/P MUDI PRA. DANGARI, MUDI PR D. JALGAON, MUDI PRA. DANGARI, JALGAON, MAHARASHTRA-425401

# सतीश पाटील यांचा सेवापूर्ती निमित्त औषधनिर्मात्यांकडून गौरव



नाशिक । प्रतिनिधी

नाशिक महापालिकेत एकोणचाळीस वर्ष इतकी प्रदीर्घ सेवा करून सेवानिवृत्त झालेल्या औषधनिर्माता सतीश पाटील यांचा सहपरिवार महापालिका सेवेतील व सर्व सेवानिवृत्त औषधनिर्माता बांधवांच्या वतीने एका छोटेखानी कार्यक्रमात गौरव करण्यात आला.

श्री स्वामी समर्थ रुग्णालय मोरवाडीसह आपल्या ३९ वर्षांच्या विक्रमी कारकिर्दीत आदर्श आरोग्य सेवा देत असतानाच पाटील यांनी खांदेशातून आलेल्या तसेच सिडकोमध्ये वास्तव्यास असलेल्या गोरगरीब, गरजू पण होतकरू आणि आर्थिक दृष्ट्या कमकुवत नागरिकांसाठी खान्देश नागरी पतसंस्था स्थापन करून, ती यशस्वीरित्या चालवून गरजूना आर्थिक मदत देत शेकडो गरिबांना आधार दिला. या सर्व कामाची दाखल घेऊन सतीश पाटील यांचा यथोचित गौरव करण्यात आला. यावेळी अनिल कोठावदे, श्याम शिरुडे, राजेंद्र पाठक, तेजस्विनी चकोर, वंदना ढाके, श्रद्धा पाटील यांनी पाटील यांचा गौरव करणारे मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन रणजित सोळंकी यांनी केले. याप्रसंगी सुरेंद्र बोरा, राजेंद्र येवले, नंदू कापसे, सुनील शिंपी, कैलास निकम, राजू उसवाडकर, नीलकंठ पितृभक्त, टिकाराम गांगुर्डे, राजू सूर्यवंशी, नाना बागुल, मोरेश्वर धारणे यांच्यासह सर्व औषधनिर्माता बांधव उपस्थित होते.

ॲड.दिनेश उत्तम फुले
निशाणी नं.६

जाहिर नोटीस

धुळे येथील मे. सिव्हील जज्ज सि. डी. सो. यांचे कोर्टात

कि.दि.अर्ज नं. ९४६/२०२३

श्री. निळकंठ दामू महाले, वगैरे- ......अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही ....जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो.(व.स्तर) यांचे न्यायालयात दि.०१/०८/२०२३ रोजी दि.कि. अर्ज नं.९४६/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी कै. पार्वताबाई दामू महाले (मयत) मु.पो. कुसुंबा ता. जि. धुळे यांचे अर्जदार नं. १ व २ हे कायदेशीर वारस असून तसा कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. (व. स्तर) यांचे न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दिनांक ११/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. (क स्तर) कोर्ट नं.८ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस या तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

धुळे
दिनांक :- ०२/०८/२०२३ आदेशावरुन

(शिक्का)

कामगिरी कारकून, मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.
अधिक्षक, मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.

निशाणी नं.६

जाहिर नोटीस

साक्री येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सो. यांचे कोर्टात

फौ. कि. अर्ज. नं. ४९२/२०२३

शाहीद अकील खाटीक, उ. व.१६ धंदा- शिक्षण ..... अर्जदार
एकमत नगर साक्री ता. साक्री जिल्हा धुळे वे
वि.
निबंधक जन्म-मृत्यू तथा नगरपंचायत कार्यालय साक्री,
साक्री ता. साक्री जि. धुळे ......सामनेवाला
शाहीद अकील खाटीक - ( जन्म दि १२/०८/१९७०)

ज्याअर्थी अर्जदार यांनी साक्री येथील मे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सो. याचे कोर्टात दि. २/०८/२०२३ रोजी फौजदारी कि. अर्ज नं. ४९२/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदार याने जन्म- मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० मधील ९ (३) प्रमाणे मृत्यूची ची नोंद करणेबाबत वरील न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. कोर्टाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता पुढील चौकशी तारीख ०५/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की. याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सो. यांचे कोर्ट नं. ३ या न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून तक्रार करावी. त्याअर्थी मे न्यायालयाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही तक्रार उपस्थित झाली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. कोटांचे सही शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ :- साक्री,
दि. ०३/०८/२०२३

(शिक्का)

क.लिपिक, फौजदारी न्यायालय साक्री
सहा.अधिक्षक, फौजदारी न्यायालय साक्री

निशाणी नं.६

जाहिर नोटीस

साक्री येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सो. यांचे कोर्टात

फौ. कि. अर्ज. नं. ३१६/२०२३

पदम गोबन राठोड, उ.व. ४७ धंदा- शेती
रा. नागपुर, (वर्धाने ) ता. साक्री जि. धुळे .....अर्जदार
वि.
म. ग्रामसेवक, निबंधक, जन्म-मृत्यू ग्रामपंचायत कार्यालय,
रा. नागपुर,(वर्धाने ) ता. साक्री जि. धुळे ......सामनेवाला
ग्यारशीबाई गोबन राठोड - ( मृत्यू दि १२/०८/१९७०)

ज्याअर्थी अर्जदार यांनी साक्री येथील मे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सो. याचे कोर्टात दि. १४/०६/२०२३ रोजी फौजदारी कि. अर्ज नं. ३१६/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदार याने जन्म- मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० मधील ९ (३) प्रमाणे मृत्यूची ची नोंद करणेबाबत वरील न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. कोर्टाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता पुढील चौकशी तारीख १३/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की. याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सो. यांचे कोर्ट नं. २ या न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून तक्रार करावी. त्याअर्थी मे न्यायालयाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही तक्रार उपस्थित झाली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. कोटांचे सही शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ :- साक्री,
दि. ०३/०८/२०२३

(शिक्का)

क.लिपिक, फौजदारी न्यायालय साक्री
सहा.अधिक्षक, फौजदारी न्यायालय साक्री

## न्यूज कॉलम

### पळासनेरला दुचाकीच्या धडकेत महिला ठार

**शिरपूर ।** भरधाव दुचाकीने धडक देऊन झालेल्या अपघातात महिला ठार झाली. हा अपघात ३१ जुलैच्या रात्री साडेनऊ ते दहाच्या दरम्यान पळासनेर (ता. शिरपूर) येथील मराठी शाळेसमोर घडला. ललिता सुरेश भिलाला (वय ३६, रा. झोपाला, ता. सेंधवा, मध्य प्रदेश) असे मृत महिलेचे नाव आहे. ती पायी जात असताना दुचाकी (एमपी ४६, एमव्ही ६८३७) ने तिला जोराची धडक दिली. या अपघातात तिचा मृत्यू झाला.

### बसचालकांसाठी नेत्र तपासणी शिबिर

**शिरपूर ।** प्रवाशांच्या सुरक्षितेसाठी धुळे जिल्ह्यातील सर्व खासगी बसमालक, चालक, वाहक यांच्यासाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी चारुदत्त व्यवहारे यांनी दिली आहे. हे शिबिर शुक्रवारी सकाळी ११ वाजता स्वयंवर लॉन्स, जुने होंडाई शोरुम, रेसिडेन्सी पार्क जवळ येथे होईल. शिबिराचा सर्व खाजगी वाहन चालक, मालकांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

# हस्ती बँकेची ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

## १६०० कोटींच्या वरील व्यवसायाचा गाठला टप्पा

**दोंडाईचा । प्रतिनिधी**




दोंडाईचा मुख्यालय असलेल्या व राज्यभर कार्यविस्तारासोबत नावलौकिक प्राप्त, उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दि हस्ती को- ऑप. बँकेची ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ३० जुलै २०२३ रविवार रोजी हस्ती बहुउद्देशीय सांस्कृतिक भवन दोंडाईचा येथे बँकेचे प्रेसिडेंट कैलास जैन यांचे अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली.

बँकेने सभासदांचे प्रशिक्षणासाठी पुण्याहून तज्ञ व्यक्ती श्री जेरे साहेब यांना बोलविले होते. सभेच्या सुरूवातीस त्यांनी नागरी बँकांची सध्याची स्थिती, रिझर्व बँकेचे नवीन सर्क्युलर तसेच सूचना यांची सविस्तर माहिती सभासदांना दिली. त्याचबरोबर कार्यशील व अकार्यशील सभासदांचे तरतुदीबाबतही सभेत माहिती देण्यात आली. यानंतर सभेच्या कामकाजास नियमानुसार सुरूवात करण्यात आली. सर्वप्रथम दिवगंत सभासद व इतर देशबांधवांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळेस बँकेचे संस्थापक अध्यक्ष स्व. हस्तीमलजी जैन, बँकेचे मार्गदर्शक स्व. शांतीलालजी जैन तथा ज्यांनी बँकेच्या आपल्या कारकिर्दित बँक सेवांचा विस्तार केला असे बँकेचे आधारस्तंभ स्व. कांतीलालजी जैन यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. यानंतर सभेच्या अजेंड्यानुसार सर्व विषयांचे वाचन करून; त्या सर्व विषयांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सभेच्या अजेंड्याचे वाचन बँकेचे सीईओ सतीष जैन यांनी केले.

बँकेचा एकुण व्यवसाय ठेवी अधिक कर्ज मिळून १६०७ कोटींचा असून; बँकेस निव्वळ नफा २०.८० कोटींचा झाला आहे. सभासदांना डिव्हिडंट १५% दराने मंजूर करण्यात आला आहे. बँकेचे ग्रॉस एनपीए प्रमाण १.८६% इतके, व नेट एनपीए ०% राखण्यात आलेले आहे. गेल्या १० वर्षापासून नेट एनपीए ०% राखण्यात बँक यशस्वी झाली आहे. बँकेचे ग्राहक खातेदारांना नेट बँकिंग वगळता इतर सर्व प्रकारच्या डिजीटल बँकिंग सेवा यशस्वीरित्या उपलब्ध केलेल्या आहेत. सभेत बँक सभासद व माजी मंत्री डॉ. हेमंतरावजी देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना हस्ती बँक लवकरच शेड्युल्ड बँकेचा दर्जा प्राप्त करेल, असे नमुद केले. सभेचे अध्यक्ष कैलास जैन यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हटले की, बँकेने गेल्या महिन्यात रूपये एक हजार

* गेल्या १० वर्षापासून नेट एनपीए ०%
* सभासदांना १५% दराने डिव्हिडंड मंजूर
* डिव्हिडंड ची एकूण रक्कम १,३५,७५,०००/ रुपये
* बँकेचा एकुण व्यवसाय (ठेवी अधिक कर्ज मिळून) १६०० कोटींच्यावर
* उत्कृष्ट शाखांना सभेत पारितोषिके

कोटीच्या ठेवींचा टप्पा गाठलेला आहे. बँकेने सर्वच स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे. रिझर्व बँकेने नागरी बँकांसाठी सध्या अनेक प्रकारचे आदेश व सूचना लागू केलेल्या आहेत. यामुळे नागरी बँकांमध्ये निश्चितच सुधारणा होतील. तसेच आपली बँक रिझर्व बँकेचे नियमांचे व अटींचे तंतोतंत पालन करीत आहे. सोबतच त्यांनी बँकेच्या पन्नास वर्षाच्या कार्यकाळाचा आढावा सभेत घेतला. यात गेल्या पन्नास वर्षात सभासदांना बँकेने २०.७२ कोटी रूपयांचा डिव्हिडंट अदा केले आहेत. याशिवाय बँकेने गेल्या कालावधीत अपघात विमा, गृप विमा अशा विविध योजनांचा फायदा दिलेला आहे. असे प्रतिपादन केले. तसेच दरवर्षाच्या परंपरेनुसार बँकेच्या २१ शाखांपैकी त्यांच्या व्यवसायातील गटानुसार उत्कृष्ट शाखेची निवड करून त्यांना सभेत पारितोषिक देऊन सन्मानीत करण्यात आले. यात २०० कोटीवरील व्यवसाय गटात - नंदुरबार शाखा, १०० ते २०० कोटी व्यवसाय गटात - शिरपूर शाखा व शहादा शाखा; तर ५० ते १०० कोटी व्यवसाय गटात - शिंदखेडा शाखा व पिंपळनेर शाखा, ३० ते ५० कोटी व्यवसाय गटात - तळोदा शाखा व सोनगीर शाखा आणि ३० कोटी व्यवसाय गटात - चाळीसगांव शाखा व विसरवाडी शाखा; या शाखांचे समिती चेअरमन, सदस्य व बँक मॅनेजर यांचा सन्मान करण्यात आला.

सभेस हस्ती बँक चे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ संचालक मदनभाऊ जैन, व्हा. प्रेसिडेंट डॉ. दिलीपकुमार चोरडिया, संचालक पहलाज माखिजा, दिलीप वाघेला, संजय दुग्गड, पी. जी. कागणे, विजय पाटिल, अमित चोपडा, सौ. मधुबाला जैन, सौ. मंजुषा पाटिल, सी.ए. शरद पसारी, माजी व्यवस्थापकीय संचालक प्रकाश कुचेरिया, सरव्यवस्थापक माधव बोधवाणी तथा बोर्ड ऑफ मॅनेजमेंट अध्यक्ष किशोर जैन, सी.ए. चेतन कुचेरिया यांचेसह सर्व शाखा सल्लागार समिती चेअरमन, सदस्य तसेच बँकेचे अधिकारी अनिल मराठे, गुलाबसिंग ठोके, एम. एल. पाटिल, नाना कागणे, अमर छाबड़ा, मनोज सोनवणे हे उपस्थित होते. सभेच्या शेवटी आभार प्रदर्शन सुनिल गर्गे यांनी केले. सभेचे कामकाज व्यवस्थित व यशस्वीरित्या होण्यासाठी बँकेचे अधिकारी व सर्व कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले. सदर सभेस बँक सभासद बहुसंख्येने उपस्थित होते.

# राज्याच्या वन्यजीव मंडळावर चैत्राम पवार यांची निवड

**पिंपळनेर । प्रतिनिधी**



बारिपाडा ता. साक्री येथील जैवविविधता समितीचे अध्यक्ष चैत्राम पवार, अभ्यासक डॉ. अंकुर पटवर्धन, वन्यजीव अभ्यासक अनुज खरे, रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टच्या प्रमुख नेहा पंचमिया यांसह विविध जिल्ह्यांतील अभ्यासक आणि स्वयंसेवी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या वर्षभरापासून मंडळावरील अशासकीय सदस्यांची नियुक्ती प्रलंबित होती. वन विभागाने बुधवारी सरकारी अध्यादेश प्रसिद्ध करून नवीन सदस्यांची नावे जाहीर केली.

गेल्या दीड-दोन वर्षांतील राजकीय घडामोडीनंतर पूर्वीच्या सरकारने नियुक्त केलेल्या सर्व समितीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने बरखास्त केल्या होत्या. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून राज्य वन्यजीव मंडळाचे अध्यक्ष मुख्यमंत्री, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मंडळाच्या बैठका झाल्या. अशासकीय सदस्यांच्या सदस्यांमध्ये विधानसभा सदस्यांसह बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, वाइल्ड लाइफ कॉन्झर्व्हेशन ट्रस्ट, टायगर रिसर्च कॉन्झर्व्हेशन ट्रस्ट या संस्थांसह डॉ. अंकुर पटवर्धन, नेहा पंचमिया, रमण कुलकर्णी, अनुज खरे, किरण शेलार, प्रवीण परदेशी, धनंजय बापट, श्रीकांत टेकाडे, चैत्राम पवार, विनायक चलकर आदींचा समावेश आहे. नियुक्तीबाबत सातत्याने झालेल्या पाठपुराव्यानंतर राज्य सरकारने बुधवारी नवीन सदस्यांची निवड जाहीर केली.

# लो.टिळक पुण्यतिथी, आण्णाभाऊ साठे जयंती साजरी



**धुळे ।** शहरातील लोकमान्य माध्यमिक विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी यावेळी मुख्याध्यापिका संगीता पाटील यांच्यासह सर्व शिक्षक आणि कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

### जगातील सर्वात लहान हार्ट पंप 'इम्पेला'च्या सहाय्याने

# मॅग्नम हार्ट इन्स्टिट्यूटमध्ये जटील अँजिओप्लास्टी यशस्वी




**नाशिक । प्रतिनिधी**

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य हृदयरोग उपचार रुग्णालय मॅग्नम हार्ट इन्स्टिट्यूटने जगातील सर्वात लहान हृदय पंप 'इम्पेला'चा वापर करून अत्यंत अवघड अँजिओप्लास्टी यशस्वी केली आहे. ही कामगिरी वैद्यकीय क्षेत्रात मैलाचा दगड मानली जात आहे. नाशिकच्या रहिवासी ७२ वर्षीय पार्वती अग्रवाल या हृदयविकाराने ग्रस्त होत्या. मात्र उपचारात जोखीम असल्याने यापूर्वी अनेक डॉक्टरांनी त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यास नकार दिला होता.


हृदयविकाराने ग्रस्त पार्वती अग्रवाल यांची प्रकृती अचानक ढासळल्याने त्यांना मॅग्नम हार्ट इन्स्टिट्यूटच्या आपत्कालीन कक्षात भरती करण्यात आले. तिथे त्यांना तीव्र कोरोनरी सिंड्रोम (हृदयरोग) असल्याचे निदान झाले. शिवाय, अँजिओग्रामने हृदयाच्या सर्व प्रमुख धमन्यांमधील अडथळे दिसून आल्याने आंतरराष्ट्रीय हृदयरोग तज्ज्ञ तथा मॅग्नम ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सचे संचालक डॉ. मनोज चोपडा यांनी इम्पेला हृदय पंपाच्या सहाय्याने शस्त्रक्रिया करण्याचा तात्काळ निर्णय घेत तज्ज्ञांच्या टीमने पार्वती अग्रवाल यांच्यावर यशस्वी शस्त्रक्रिया केली. सद्यस्थितीत श्रीमती अग्रवाल यांची प्रकृती ठणठणीत आहे.

या संदर्भात डॉ. मनोज चोपडा यांनी माहिती दिली की, कमजोर हृदय, धमनीतील अडथळे, वृद्धत्व, मधुमेह किंवा किडनी समस्या, हृदय निकामी होण्याची मध्यम ते गंभीर लक्षणे असल्यास शस्त्रक्रियेदरम्यान गुंतागुंत होण्याचा धोका जास्त असतो. अशा शस्त्रक्रियेत मोठी जोखीम असते. प्रक्रियेपूर्वी इम्पेला पंप टाकून, आम्ही त्यांच्या कमकुवत हृदयाच्या पंपिंग कार्याला आधार देऊ शकलो आणि हृदय, मूत्रपिंड आणि मेंदूसह सर्व प्रमुख अवयवांमध्ये सतत रक्त प्रवाह सुरु राहिला. शस्त्रक्रिये दरम्यान इम्पेला हार्ट पंपचा वापर अपरिहार्य बनला होता. हा पंप ओपन-हार्ट शस्त्रक्रियेची गरज न पडता तो मांडीच्या लहान पंक्चरद्वारे घातला जाऊ शकतो. शिवाय, इम्पेला वापरण्याचे फायदे प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही वाढतात. असेही डॉ. मनोज चोपडा यांनी सांगितले.

# अहिल्यामाई होळकरांच्या स्मृतीदिनी राज्यात एकाचवेळी वृक्षारोपणासह प्रबोधनचा कार्यक्रम

## मौर्य क्रांती महासंघाचा उपक्रम

**धुळे । प्रतिनिधी**



३० जुलै रोजी मौर्य क्रांती महासंघ महाराष्ट्र राज्य शाखेची जालना या ठिकाणी राज्य स्तरीय बैठक संपन्न झाली. राज्यभरातून उपस्थित झालेल्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या या बैठकीत अनेक महत्वपूर्ण अशा धनगर, बहुजन समाजाच्या ज्वलंत प्रश्नांवर चर्चा झाली.

त्यासोबतच सर्वानुमते निर्णय घेण्यात आला की यावर्षाचा लोकमाता पु. अहिल्यामाई होळकर यांचा १३ऑगस्ट हा स्मृतीदिन अहिल्यामाई होळकरांच्या विचारांचा, त्यांच्या कार्य सिद्धांताला अनुरूप असा कृतिशील कार्यक्रम आपण संपूर्ण महाराष्ट्राला दिला पाहिजे. या विषयावर सखोल चिंतन करत संपूर्ण महाराष्ट्रात धनगर आणि बहुजन समाजात जागृती घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या ज्या विविध समाज संघटना आहेत. त्यांना सोबत घेऊन आपण अहिल्या माई होळकर यांचा स्मृती दिवस यादगार बनवला पाहिजे, यावर सर्वांमध्ये एकमत झाले. आणि त्यातून संपूर्ण महाराष्ट्रात एकाचवेळी गाव, तालुका, जिल्हा आणि राज्य पातळीवर पर्यावरण रक्षक लोकमाता पु.अहिल्या माई होळकर यांच्या स्मृती दिनानिमीत्त वृक्षारोपण व प्रबोधन कार्यक्रम करण्याचे निश्चित करण्यात आले. या भूमिकेचे सर्वांनी स्वागत केले.

१३ ऑगस्ट २०२३ रोजी धनगर आणि समस्त बहुजन समाजाची जी लोकदैवते आहेत. त्या त्या स्मृतीस्थळांच्या ठिकाणी म्हणजे बिरोबा, खंडोबा, भैरोबा, विठोबा, म्हसोबा, तसेच राज्यभरातील अनाथ आश्रम, वृद्धाश्रम असतील किंवा बहुजन महापुरुष यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ठिकाणे असतील, गड, किल्ले, स्मृतीस्थळे असतील. त्या त्या ठिकाणी वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षक लोकमाता पु. अहिल्यामाई होळकर यांचा संदेश समाज मनात प्रत्यक्ष कृतीतून रुजवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी त्या त्या भागात कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. यासाठी मौर्य क्रांती महासघाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी स्थानिक पातळीवर गावचे सरपंच आणि बहुजन समाजातील विविध सेवाभावी संस्था, आणि संघटना यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांचेशी प्रत्यक्ष संवाद साधून वृक्षारोपण व प्रबोधन कार्यक्रमाचे नियोजन करत असल्याचे मौर्य क्रांती महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बलभीम माथेले, राज्य अध्यक्ष राजीव हाके, राज्य प्रभारी ॲड. उत्तम कोळेकर, उपाध्यक्ष. प्रकाश कुटे, महासचिव हनुमंत दवंडे यांनी कळवले आहे.

# होळ येथील कृषी माध्यमिक विद्यालयात पालक शिक्षक मेळावा






**शिंदखेडा । प्रतिनिधी**

तालुक्यातील होळ येथील कृषी माध्यमिक विद्यालय होळ या शाळेत पालक शिक्षक मेळावा उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक डि.पी.सिसोदे हे होते. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून होळ येथील महेंद्र कोळी, धांदरणे येथील रवींद्र सिंग गिरासे, डाबली येथील विश्वास सोनवणे व दसवेल येथील दत्तात्रय पाटील ज्येष्ठ वरिष्ठ पालक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांचे हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले तदनंतर कार्यक्रमाची प्रस्तावना विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक एच.एन. ठाकरे यांनी प्रास्ताविक करुन विद्यालयातील उज्वल यशाची चालत आलेली परंपरा स्पष्ट केली.

या शिक्षक-पालक सभेत विद्यार्थी-शिक्षक-पालक यांच्यात संवाद व्हावा व विद्यार्थ्यांची प्रगती पालकांना समजावी या उद्देशाने या सभेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अनेक महत्त्वाच्या विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. त्यामध्ये वाचन लेखन प्रकल्प,स्कॉलरशिप,एन एम एस यांचे जादा तासिका, विद्यार्थी उपस्थिती, विद्यार्थी आरोग्य, तसेच विविध योजनांची माहिती आणि मानव मिशन अंतर्गत होणारे विद्यार्थ्यांना लाभ, इयत्ता दहावी विद्यार्थी अभ्यास मार्गदर्शन,शैक्षणिक समस्या असे अनेक विषयांवर प्रश्नोत्तरातुन सकारात्मक चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाच्या समारोपी अध्यक्ष भाषण म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक डि.पी.सिसोदे यांनी गृहकार्य अभ्यास सराव,आरोग्य व स्वच्छता,विद्यार्थी उपस्थिती तसेच विविध स्पर्धा परीक्षा तसेच शालेय उपक्रमात विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग या विषयावर मार्गदर्शन केले व पालकांच्या समस्यांची निराकारण केले यावेळी विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पालक उपस्थित होते तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाय.जी.सोनवणे यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक श्री.एस. डी.महाले सर यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रम संपन्न केला.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438,
प्रा.भूषण पाटील: 7709100798
ज्ञानगंगा घरोघरी
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518,
सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# लांडोर बंगला परिसरात स्नेहमिलनासह वनभोजनाचा निसर्गानंद

## आनंद लोंढे, शंकर खरात, किरण गायकवाड यांचे आयोजन





















धुळे।विश्वरत्न

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करताना धुळे पोलीस दलाने खूप चांगले सहकार्य केले. काही अप्रिय घटनांच्या पार्श्वभूमीवर मोर्चे निघाले, आंदोलने झाली. समाजजीवनात अस्वस्थता व अशांततेचे वातावरण निर्माण झाले. या सर्व तणावग्रस्त परिस्थितीत पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, उपअधीक्षक रुषीकेश रेड्डी व वरिष्ठ पोलीस अधिकारींचे नेतृत्व व मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलीस दलाने कोणतेही अनुचित प्रकार घडू न देता परिस्थितीवर बारीक लक्ष देवून नियंत्रण ठेवले. समाजातील प्रत्येक घटकांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण केला. याबद्दल पोलीस दलाचे आभार मानण्यासाठी पोलीस अधिकारीवर्गाला या स्नेहमिलन सोहळ्याला विशेष आमंत्रित करण्यात आले होते. तसेच दलित, पुरोगामी चळवळीत सक्रीय असलेल्या विविध दलित पक्ष, संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मान्यवर तसेच काही पत्रकार मित्रांनाही या सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले होते. या सर्वांनी स्नेहमिलन सोहळ्यात हजेरी लावून एकमेकांच्या भेटीगाठी घेत, गप्पा रंगवित वनभोजनाचा निसर्गानंद घेतला. याप्रसंगी धुळे शहर वाहतूक शाखेचे पी.आय. भूषण कोते, मोहाडी पोलीस ठाण्याचे एपीआय शशिकांत पाटील, धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पी.आय. प्रमोद पाटील, वाहतूक शाखेचे एपीआय जितेंद्र आखाडे, ज्येष्ठ दलित नेते एम. जी. धिवरे, ॲड. विलास झाल्टे, आरपीआय आठवले गटाचे नेते शशिकांत वाघ, माजी उपमहापौर नागसेन बोरसे, माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाठ, दलित नेते श्रावण खैरनार, प्रभाकर जाधव, बौध्दाचार्य सुरेश लोंढे, महिला नेत्या नयना दामोदर, राष्ट्रवादीच्या सरोज कदम, संगिता खैरनार, मंगला मोरे, अंजुताई चव्हाण, आरोग्य विभागाचे संजय पवार, महेंद्र शिरसाठ, वचितचे जिल्हाध्यक्ष अरविंद निकम, युवानेते मुकेश खरात, चंद्रकांत सत्तेसा, विशाल पगारे, दिनेश निकुंभे, मनीबाबा खैरनार, डॉ. भूषण पाटील, आबा खंडारे, राजूबाबा शिरसाठ, बापूसाहेब बाविस्कर, संजय जवरास, अमोल शिरसाठ, आबासाहेब अमृतसागर, रामकृष्ण नेरकर, गौतम पगारे, विनोद केदार, पुरोगामी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष सुकलाल बैसाणे, अनिल ठाकूर, पत्रकार रवि नगराळे, सचिन बागुल, सुनील बैसाणे, सनी सोनवणे, नागिंद मोरे, रवि कढरे, संजय गवळी, दीपक खैरनार, प्रवीण मोरे, नितीन म्हसदे, पाटील, महेंद्रसिंग राजपूत यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

संकलन : सचिन बागुल

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# लांडोर बंगला परिसरात स्नेहमिलन व वनभोजन

## आनंद लोंढे, शंकर खरात, किरण गायकवाड यांचे आयोजन





















धुळे । मुंबई-आग्रा महामार्गावर धुळे शहरापासून जवळच असलेल्या किल्ले लळींग कुरणातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य लाभलेल्या लांडोर बंगला येथील निसर्गरम्य परिसरात स्नेहमिलन व वनभोजनाचा कार्यक्रम बुधवारी पार पडला. आझाद समाज पार्टीचे प्रदेश कार्याध्यक्ष आनंद साहेबराव लोंढे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक शंकर खरात, समता समाज संघाचे जिल्हाध्यक्ष किरण गायकवाड यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. आजच्या धावपळीच्या व धकाधकीच्या युगात माणूस माणसांमध्ये राहूनही माणूसपणापासून दूर झाला आहे. एकमेकांना भेटायला, बोलायला वेळ मिळत नाही. नातलगांशी संवाद होतोय पण तो प्रत्यक्ष नाही तर मोबाईलवर होतोय. मित्र मंडळी, सहकारी, आप्तेष्ट हे देखील मोबाईलच्या संपर्कानेच कनेक्ट होतात. फेस टु फेस संपर्क व्हिडिओ कॉलिंगनेच केला जातोय. काय हवे, काय नको, उठलात का, जेवलात का, झोपलात का, गुड मॉर्निंग, गुड नाईट, हॅप्पी बर्थ डे, हॅप्पी ॲनिव्हर्सरी, भावपूर्ण श्रध्दांजली हे सारं काही सोशल मीडिया वापरातूनच चालले आहे. माणूस माणसापासून हरवलाय असं देखील मोबाईलवरुनच वाचायला मिळत आहे. अशा या बिझी शेड्युलिंगच्या दुनियेत आपण आपल्या जवळच्या व्यक्तींना भेटावे, मनमोकळे बोलावे, गप्पा मारत एकमेकांसोबत वेळ घालवावा. तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती, लांडोर बंगला येथील 'भीमस्मृती यात्रा' यासह विविध कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पोलीस प्रशासनाने केलेल्या अनमोल सहकार्याबद्दल त्यांना धन्यवाद देणे या उद्देशाने आनंद लोंढे, शंकर खरात, किरण गायकवाड यांनी लांडोर बंगला परिसरात आयोजित केलेला स्नेहमिलन आणि वनभोजनाचा हा कार्यक्रम बुधवार दि. २ ऑगस्ट रोजी पार पडला.

संकलन : सचिन बागुल